**अभ्यंकर मंडळाची २९ वी वार्षिक सर्व साधारण सभा व स्नेह सम्मेलनाचे इतिवृत्त**

अभ्यंकर मंडळाची २९ वी वार्षिक सर्व साधारण सभा व स्नेह सम्मेलन शनिवार दिनांक २५ डिसेंबर २०२१ रोजी ब्राह्मण सभा ठाणे येथे संपन्न झाले. चहा नाश्ता झाल्यावर सभेस सुरुवात झाली.

उपस्थितांते स्वागत करुन मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. भगवान परशुराम, श्री योगेश्रवरी देवी, श्री व्याडेश्वर व श्री गणपतीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

तदनंतर ज्ञात व अज्ञात दिवंगत अभ्यंकरांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

श्री विजय अभ्यंकर, विरार यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्रथे प्रमाणे उपस्थितांतून लेखक, पत्रकार श्री रामकृष्ण विनायक अभ्यंकर, बोरिवली यांची संमेलनाध्यक्ष म्हणून निवड करण्यांत आली. संमेलनाध्यक्षांचा परिचय करुन दिल्यावर मंडळाचे अध्यक्ष श्री निशिकांत यांनी त्यांचे स्वागत शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन केले. संमेलनाध्यक्षांचा परवानगीने सभेस सुरुवात करण्यांत आली व खालील ठराव सम्मत करण्यांत आले:-

ठराव क्र.१) कोविड-१९ च्या साथीमुळे व सरकारी निर्बंधामुळे २०२० साली सम्मेलन होऊ शकले नाही. त्यामुळे नोव्हेंबर २०१९ च्या चित्तपावन संघ गिरगांव येथे झालेल्या सभेचे इतिवृत्त व मंडळाच्या २०१९-२० व २०२०-२१ चा जमा-खर्च व ताळेबंद अहवालाचे वाचन करण्यांत आले व तो सर्वानुमते मंजूर करण्यांत आला.

सूचक : श्री विवेक दत्तात्रय अभ्यंकर
अनुमोदक : श्री विजय भास्कर अभ्यंकर

ठराव सर्वानुमते सम्मत.

ठराव क्र.२) मंडळाचे सनदी लेखा परीक्षक विनय आचरेकर आणि कंपनी चार्टड अकोंटेट यांनी वैयात्तीक कारणाने पुढे काम करण्यास असमर्थता दर्शविली व तसे पत्र मंडळास दिले. ते सभेत सर्वानुमते मंजूर करण्यांत आले. त्यांच्या जागी गिरिश गावडे आणि कंपनी चार्टड अकोंटेट यांची सनदी लेखापाल म्हणून २०२०-२१ व २०२१-२२ साठी नियुक्ती करण्यात यावी व योग्य ते मानधन दिले जावे असा ठराव मांडण्यांत आला.

सूचक : श्री अशोक अभ्यंकर
अनुमोदक : श्री लिलाधर अभ्यंकर

ठराव सर्वानुमते सम्मत करण्यांत आला.

सम्मेलनाध्यक्ष व मंडळाचे अध्यक्ष यांच्या हस्ते खालील सत्कार करण्यांत आले:-

- ❖ **उद्योग क्षेत्रात विशेष कामगिरी करणा-या व्यक्तिला कै. मंगलाताई गोपाळराव अभ्यंकर यांच्या स्मरणार्थ श्री विजय यशवंत अभ्यंकर रा. जांभुळपाडा यांना आयुर्वेदीक औषध निर्मिती उद्योग करिता मानाचा "उद्योगश्री पुरस्कार", प्रशस्तीपत्र व सम्मानचिह्न देऊन जाहिर सत्कार करण्यांत आला.**

- विशिष्ठ क्षेत्रात विशेष नैपुण्य प्राप्त करणा-या खालील मान्यवरांना “कै. ज.द.अभ्यंकर यांच्या स्मरणार्थ “नैपुण्य पुरस्कार”, प्रशस्तीपत्र व सम्मानचिह्न देऊन जाहिर सत्कार करण्यात आला:-

  (१) डॉ. महेश अभ्यंकर यांना कोविड वॉरियर व वैद्यक शास्त्रात विशेष मार्गदर्शन व सामाजिक कार्य तसेच मराठी व इंग्रजी मध्ये पुस्तक लेखन या करिता

  (२) श्री रामकृष्ण विनायक अभ्यंकर यांना वर्तमान पत्र, मासिके, साप्ताहिके व दिवाळी अंकात लेख व मुक्त पत्रकारिता, आध्यात्मिक व पर्यटन क्षेत्रात विशेष कार्य केल्या बद्द्ल.

- कै. सुधाकर कृष्णाजी उर्फ बापू अभ्यंकर यांच्या स्मरणार्थ खालील विद्यार्थांचा प्रशस्तीपत्र व सम्मानचिह्न देऊन जाहिर सत्कार करण्यात आला:-

  (१) कु. स्वरांगी संजय अभ्यंकर, माध्यमिक परीक्षा ८२% ने प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

  (२) कु. नेहा महेश अभ्यंकर, उच्च माध्यमिक परीक्षा व नीट परीक्षा मेरिट श्रेणीत उत्तीर्ण

  (३) कु. कनिका संदिप अभ्यंकर जाहिरात क्षेत्रात स्नातकोत्तर परिक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

- खालील दांपत्याच्या विवाहाला ५० वर्ष पूर्ण झाल्या बद्दल त्यांचा शाल व श्रीफळ देऊन जाहिर सत्कार करण्यात आला:-

  (१) श्री कृष्णकुमार केशव लिमये व सौ प्रतिभा कृष्णकुमार लिमये (माहेरवाशिण)

  (२) श्री गोपाळ मुकुंद अभ्यंकर व सौ सुलभा गोपाळ अभ्यंकर

  (३) श्री श्रीकृष्ण नारायण अभ्यंकर व सौ मनिषा श्रीकृष्ण अभ्यंकर

  सर्वांनी आपली मनोगते व्यक्त केली व मंडळाचे आभार मानले.

- खालील सभासदांनी ७५व्या वर्षात पदार्पण केल्याबद्दल त्यांचा शाल व श्रीफळ देऊन जाहिर सत्कार करण्यात आला:-

  (१) श्री कृष्णकुमार केशव लिमये (२) सौ प्रतिभा कृष्णकुमार लिमये

  (३) श्री गोपाळ मुकुंद अभ्यंकर (४) सौ सुलभा गोपाळ अभ्यंकर

  (५) श्री श्रीकृष्ण नारायण अभ्यंकर (६) सौ मनिषा श्रीकृष्ण अभ्यंकर

  (७) श्री नरेंद्र अभ्यंकर (८) श्री माधव बाळकृष्ण अभ्यंकर

  वरिल सर्वांनी आपली मनोगते व्यक्त केली व मंडळाचे आभार मानले. तदनंतर उपस्थित माहेरवाशिणींचा पुष्प गुच्छ देऊन जाहिर सत्कार करण्यांत आला. मागील दोन वर्षात मंडळाला देणगी दिलेल्या देणगीदारांचा सम्मान चिह्न देऊन जाहिर सत्कार करण्यांत आला.

❖ खालील नवदांपत्याचा  शाल व श्रीफळ देऊन जाहिर सत्कार करण्यांत आला:-

(१) श्री दिव्यंशू दिलीप अभ्यंकर व सौ गौरी दिव्यंशू अभ्यंकर

(२) श्री आदित्य दिलीप अभ्यंकर व सौ गौरी आदित्य अभ्यंकर

(३) श्री रुषिकेश विजय अभ्यंकर व सौ नेहा रुषिकेश अभ्यंकर

❖ सन २०२१ ते २०२६ या कालावधि साठी अभ्यंकर मंडळाच्या नविन कार्यकारिणीची निवड करणे:

खालील पदाधिका-यांची सर्वानुमते निवड करण्यांत आली:-

- अध्यक्ष: श्री निशिकांत शंकर अभ्यंकर
- उपाध्यक्ष: श्री नरेंद्र अभ्यंकर
- सचिव: श्री विवेक दत्तात्रय अभ्यंकर
- कोषाध्यक्ष: श्री अशोक अभ्यंकर
- कार्यकारिणी सदस्य:

(१) श्री लिलाधर अभ्यंकर—ठाणे

(२) विजय भास्कर अभ्यंकर- विरार

(३) श्री विजय वामन अभ्यंकर-  विले पारले

(४) श्री संजय प्रभाकर अभ्यंकर- चेंबूर

(५) श्री संदिप अभ्यंकर- बोरिवली

(६) श्री दिपीप गणेश अभ्यंकर-बदलापुर

(७) श्री सचिन दिनकर अभ्यंकर- पुणे

(८) श्रीमती रेखा सुधाकर अभ्यंकर—ठाणे

(९) सौ. अलकनंदा मेढेकर-विले पारले

(१०) सौ. स्वप्ना गोखले- मुलुंड

(११) विनय सुधाकर अभ्यंकर- ठाणे

स्वीकृत सदस्य:

(१) सौ. अनिता विनय अभ्यंकर- ठाणे

(२) श्री पार्थ नरेंद्र अभ्यंकर- विले पारले

(३) श्री दीपांकर दिलीप अभ्यंकर- बदलापूर

सम्मेलनाध्यक्ष श्री रामकृष्ण अभ्यंकर यांनी सभेस संयम व विवेक या संबंधी मार्गदर्शन केले. डॉ. महेश यांनी कोविड-१९ व वैद्यक शास्त्रावर संदर विवेचन करुन उपस्थितांना नविन माहिती दिली. श्री विजय यशवंत अभ्यंकर यांनी व्यवसायासाठी वाटचाल व संघर्ष व यश या विषयी माहिती दिली. काही सभासदांनी पण आपली मनोगते व्यक्त केली.मंडळाचे अध्यक्ष श्री निशिकांत शंकर यांनी अध्यक्षीय भाषणात मंडळाचे कामकाज व पुढील वाटचाल या विषयी सविस्तर माहिती दिली. श्री दिलीप अभ्यंकर यांनी आभार प्रदर्शन करुन सभा संपल्याचे जाहिर केले. उपस्थित असलेल्या ८० सभासदांनी सुरुची भोजनाचा आस्वाद घेतला. जांभुळपाडा येथील श्री विजय यशवंत अभ्यंकर यांनी पुढील सम्मेलन जांभुळपाडा येथे व्हावे अशी इच्छा प्रकट केली व सभेने त्यास अनुमोदन दिले. चहापान झाल्यावर सम्मेलनाची सांगता झाली.